स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या मानवविज्ञान विद्याशाखा, विधी व सामाजिक शास्त्र विद्या शाखेच्या अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा.

“नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती”

संशोधक

बसवंते अविनाश शेषराव

(एम.ए. इतिहास, नेट)

मो. नं. 9823733464

ई-मेल - avinashbaswante95@gmail.com

जात वर्ग - SC

ता. कंधार जि. नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. साखरे व्ही.के.

संशोधन मार्गदर्शक, प्राध्यापक तथा पदवी व पदवीत्तर

इतिहास विभाग

मो. न. 9890749443

ई-मेल -vijayasakhare1969@gmail.com

ता. कंधार जि. नांदेड

संशोधन केंद्र

श्री शिवाजी कॉलेज आर्ट्स, कॉमर्स आणि सायंन्स

शिवाजी नगर

ता. कंधार जि. नांदेड

अनुक्रमणिका

अ. क्र.	घटक
1)	प्रस्तावना
2)	संशोधन विषयाची गरज आणि निवड
3)	संशोधन विषयाचे महत्व
4)	समस्या विधान
5)	कार्यात्मक व्याख्या
6)	संशोधनाची उदिष्टये
7)	संशोधनाची गृहितके
8)	संशोधनाची परिकल्पना
9)	शून्य परिकल्पना
10)	संशोधनाची व्याप्ती
11)	संशोधनाची मर्यादा
12)	परिमर्यादा
13)	संशोधनाची कार्यपद्धती
14)	नमुना व नमुना निवड पद्धत
15)	संशोधनाची कार्यवाही
16)	प्रयोजन
17)	प्रबंधाचे प्रकरण योजना
18)	कार्यसूची वेळापत्रक
19)	संदर्भ सूची

विषयाचे नाव :-

“नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा सामाजिक आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती”

प्रस्तावना :-

प्राचीन काळापासून जातीव्यवस्था ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था असा प्रवास आहे. भारतीय समाजव्यवस्थेत कर्मानुसार प्रथम चार वर्ण उद्यास आले. ब्राहमण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र नंतर या वर्णातून व्यवहार सुकरर्तीसाठी व्यवसायावरुन जाती निर्माण झाल्या. आजपर्यंत भारतीय समाजाचे वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची कमी अधिक 3000 जाती आणि पोटजातीमध्ये विभागणी आहे. मागासलेला समुदाय ऐतिहासिक कारणांमुळे सामाजिक, आर्थिक व राजकीय मागास राहिलेल्या जातीचे पुन्हा पोटजाती निर्माण झाल्या. जातीचे जाळे एवढे प्रचंड वाढले त्यांची संख्या हजारोंच्याही पुढे गेली. त्यामुळे भारतात नेमक्या व निश्चित किती जाती जमाती आहेत हे सांगता येण कठीण आहे.

डॉ. श्री. व्य. केतकर यांच्या मते, भारतात चार हजार जाती असाव्यात तर डॉ. चांदेकरांच्या मते, या जातीची संख्या सहा हजारांच्या वर असावी एवढ्या प्रचंड संख्येने भारतात जाती जमाती प्राचीन काळापासून आपल्याच कोषात राहून जीवन जगत आहेत. गावकुसा बाहेर राहणाऱ्या व अस्पृश्य म्हणून हिणवल्या गेलेल्या जातींना धार्मिक व सामजिक नियमांनी त्या बांधिलकी आहेत. इंग्रज भारतात येण्यापूर्वी व शिक्षणाचा प्रसार होण्यापूर्वी कोणतीही अस्पृश्य जात जातीबाहय काम करण्यास धजत नव्हती. समाजात वावरताना जातींना कडक बंधनाचा एक कोष त्यांच्याभोवती विणला गेला. ते जाळे तोडून बाहेर पडणे अवघड होते. प्रत्येक जातीला स्वतःचे काम नेमून दिले जात होते. त्याशिवाय इतर कोणतीही जात ते काम करुन शकत नव्हती. त्यापैकीच एक असलेली महाराष्ट्रातील ग्रामीण समुदायातील बलुतेदारी व्यवस्थेत मांग जातीचे स्थान असून सामजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात जाती गटांची त्यांचा निश्चित संबंध आहे. महाराष्ट्रात या जातीचे केंद्रिकरण झालेले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक गावात प्राधान्याने मातंग समाज आढळतो. या तथ्यांचे समर्थन गाव तेथे मांग वाडा. असा इरावती कर्वे यांच्या विधानातून करता येईल. मातंग समाज व त्यांच्या पुढील काही पोटजाती पुढीलप्रमाणे :- मांग गारुडी, होलार मांग, खाटीक मांग, ढोर मांग, मोची मांग, मादिगा, बुरुड मांग इत्यादी या सर्व जाती व पोटजातींना दिर्घकाळ अस्पृश्यता म्हणून आधी व आताही गणल्या जाते. तसेच या मातंग समाजाचे सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या भेदभाव असमानता आणि गरिबी यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो व त्यांमुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासांत अडथळा उत्पन्न होतो आणि हा मातंग समाज संधी तसेच संसाधनापासून वंचित राहिला आहे. व या समाजातील गटांना फायदेशीर रोजगारांद्वारे त्यांची उपजिवीका करण्यासाठी पुरेशी आर्थिक संधी उपलब्ध नाही आणि त्यांना समाजात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टया आजही वंचित आहे. अस्पृश्यता म्हणून

समजलेला मातंग समाज राष्ट्रीय, जिल्हा, उपजिल्हा आणि स्थानिक गावपातळीवर गंभीर, समाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांचा आजही सामना करावा लागतो.

मी स्वतःहा मातंग समाजातील संबंधित असल्यामुळे माझा जो विषय आहे. नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती याविषयी लिहण्याचा जो प्रयत्न केला आहे. व तसेच माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. साखरे व्ही, के. मॅडम यांच्याजवळ व्यक्त केलो त्यांनी माझ्या या संशोधनाला परिपूर्तता यावी व योग्य न्याय मिळावा म्हणून मार्गदर्शन केले.

संशोधन विषयाची गरज आणि निवड :-

भारतीय जातीव्यवस्थेत मातंग समाजाची उत्पत्ती कशी झाली ? आज हजारों वर्षापासून हा समाज एकेकाळी स्वतःला राजकर्ती जमात म्हणून ओळख असलेल्या या समाजाला आज अस्पृश्य म्हणून मानली गेली आहे. हा समाज पारंपरिक रुढीनुसार हलगी वाजवणे, मढयाचा गोवऱ्या वाहणे, बिगार करणे, बाजा वाजवणे, टोपली बनवणे, दोरी वळणे, झाडू बनवणे अश्या प्रकारचे काम करुन लोकांच्या गरजा भागवित आहेत. मातंग समाज हा महाराष्ट्रातील प्रमुख जातीपैकी एक आहे. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या जनगणनेनुसार दुसऱ्या क्रमांकावर अनुसूचित जातीमध्ये लोकसंख्येत आहेत. तसेच ऐतिहासिक दृष्टया त्यांना अस्पृश्य जात म्हणून मातंग समाजाला ओळखले जाते. तसेच महार (आताचा बौद्ध समाज) आणि चांभार यांसारख्या महाराष्ट्रातील इतर अस्पृश्य जातीतील समुदायाच्या तुलनेत मातंग समाज हे निरक्षर आणि कमीत कमी जमवलेला समुदाय आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजाचा वास्तविक स्थितीचे विश्लेषण केले आहे. जिते दलित राजकारणाने अनुसूचित जातीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. असे असूनही सर्व अनूसुचित जातीमध्ये मातंग समाजाच्या जीवनात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मापदंडामध्ये समान प्रमाण विकसित झालेला नाही. महाराष्ट्रातील महार आणि चांभार या जातीपेक्षाही मातंग समाज सर्व गोष्टीत खालच्या पातळीवर राहिला आहे. गावामधील कारभार आणि बलुतेदारी व्यवस्थेत त्यांना महत्त्वाचे स्थान होते. तरी महाराष्ट्रात शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टया सर्वाधिक दडपलेला आणि दुर्लक्षित झालेला समाज आहे.

अस्पृश्यांच्या श्रेणीत मोडणाऱ्या व आजही अत्यंत गरिबीत जीवन जगणाऱ्या मातंग समाजाच्या व आर्थिक स्थितीचा अभ्यास करुन त्याची ऐतिहासिक अभिलेखांकन करावे या हेतून मी (नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती) हा विषय निवडला आहे. त्यासाठी नांदेड जिल्ह्यातील मातंग कुटुंबांचा एका प्रश्नावलीद्वारे मुलाखती घेतल्या आहे. त्यामध्ये त्या समाजाची समाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती कशाप्रकारे परिवर्तनशील राहिली याचा ऐतिहासिक आढावा या प्रबंधात घेतला आहे. या माध्यमातून मातंग समाजाच्या इतिहासाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती :- या संशोधन विषयांमध्ये महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. कारण नांदेड जिल्हयातील अस्पृश्य वंचित म्हणून गणल्या गेलेल्या मातंग समाजाचा परिस्थितीचा अभ्यास व अस्पृश्य जात म्हणून मातंग समाजाकडे पाहण्यात येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात या मातंग जातीने अस्पृश्यतेचे अनेक चटके भोगले आहेत. गरिबी, अवहेलना, गलिच्छ काम, समाजापासून दूर राहणे असे जीवन तो जगत आला आहे. अशा परिस्थितीही मातंग समाजात लहुजी साळवे, मुक्ता साळवे, फकिरा, येल्ला मांग, सर्जा मांग, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांसारखे क्रांतिकारक व समाजसुधारक होऊन गेले. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता हयांचा पुरस्कार केला. पण तत्कालीन कर्मठांनी त्यांनाही त्रास दिला. मातंग समाजातील थोर महापुरुषांचा वारसा घेऊन सद्यस्थित असलेला मातंग समाज हा आपली ओळख निर्माण करुन राहत आहे. परंतु इतिहासाने या अस्पृश्य म्हणून हिणवल्या गेलेल्या मातंग समाजाला आणि त्यांच्या समाजातील महापुरुषांकडे दुर्लक्ष केले आहे. या सर्व दुर्लक्षित झालेल्या मातंग समाजातील त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पैलूवर प्रकाश टाकण्याच्या हेतूपायी प्रस्तुत विषयांची निवड करुन या विषयांवरील वेगळेपणावर प्रकाश टाकण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

पुर्व संशोधनाचा आढावा :-

मागील झालेल्या संशोधनाचा आढावा घेऊन जे निष्कर्ष काढले गेले आहेत. या समाजावर कमी प्रमाणावर संशोधन झाले. जे झाले ते एका विशिष्ट घटक घेऊन मांडण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील अनुसुचित जाती मधील मातंग समाज हा लोकसंख्येने दुसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच औरंगाबाद प्रशासकीय विभागातील सगळयात मोठ्या तालुक्याचा जिल्हा म्हणुन नांदेड जिल्हा ओळखला जातो. येथे मातंग समाज मोठ्या प्रमाणावर आहे. या समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास याचा अभ्यास केला जाईल. या आधी मातंग समाजावर काही संशोधकानी व लेखकानी लिहण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात पुढील लेखकांचा समावेश आहे : तुंटे विजय साहेबराव , सकटे मच्छिद्र ज्ञानु, वाघमारे सुभाष शंकर, आवघडे लक्ष्मण ए., डॉ. शरद गायकवाड, माधव बसवंते, डॉ. मारोती कसाब, डॉ. सी.के. हरणावळे इत्यादी.

समस्या विधान :-

नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा सामाजिक आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती : हा विषय संशोधनसाठी निवडला आहे.

कार्यात्मक व्याख्या :-

नांदेड जिल्हा :-

महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद या प्रशासकीय विभागातील सर्वात जास्त तालुके असणारा नांदेड जिल्हा हा गोदावरी नदीच्या उत्तर तिरावर वसलेला एक ऐतिहासिक ठिकाण म्हणून ओळखले जाते व या नांदेड जिल्ह्यात सोळा तालुके आहेत.

संशोधनाची उदिष्टये :-

अकादमिक व विविध क्षेत्रात संशोधन करीत असताना निश्चित असे उदिष्टये निर्धारित करण्यात आलेली असतात प्रस्तुत संशोधन विषयांसाठी पुढीलप्रमाणे उदिष्टये निश्चित केलेली आहेत.

1) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजातील लोकांचा राहणीमाणाचा अभ्यास केला जाईल.
2) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजातील सामाजिक स्थिती व स्त्रियांचा दर्जा यांचा अभ्यास केला जाईल.
3) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजाचा आर्थिक समस्यांमुळे झालेल्या स्थितीवर प्रकाश टाकला जाणार आहे.
4) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजाचा राजकीय चळवळीतील सहभागाचा परामर्श घेतला जाईल.
5) मातंग समाजातील सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकला जाणार आहे.
6) मातंग समाजाचा आर्थिक समस्या व ह्यामुळे झालेला बदल याची माहिती मांडली जाणार आहे.
7) मातंग समाजाच्या अधोगतीला सबळ व पुढारलेल्या जातीच्या अडथळ्यांचा मागोवा घेतला जाणार आहे.

संशोधनाची गृहितके :-

1) मातंग समाज हा विविध अंगानी मागासलेला आहे.
2) मातंग समाजाला सामाजिक व सांस्कृतिक इतिहास आहे.
3) मातंग समाजाचा गौरवशाली राजकिय इतिहास आहे.
4) मातंग समाजाचे देशाच्या इतिहासातील योगदान अनन्य आहे.
5) शासकिय व अशासकिय लिखीत साधनामधुन मातंग समाजाचा इतिहास अधोरेखीत झालेला आहे.
6) मातंग समाजाचा इतिहास ब्रिटीश कालीन व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील विविध ग्रंथाच्या माध्यामातून लिहण्यात आलेला आहे.

संशोधनाची परिकल्पना :-

1) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय, परिस्थिती व सद्यस्थिती खूप हलाखीची असण्याची शक्यता आहे.
2) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाज हा इतर मागास समाजापेक्षाही सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय दृष्टया मागास असण्याची शक्यता असू शकते.
3) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजातील महिला व पुरुष ह्यांच्या तुलनेत समाजातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय परिस्थिमुळे महिला व पुरुषांच्या जीवनावर फरक पडण्याची शक्यता आहे.

शून्य परिकल्पना :-

1) नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजातील सामाजिक, आर्थिक, व राजकीय, परिस्थितीचा सार्थ फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती :-

कुठलेही संशोधन करतांना संशोधकाला या विषयांची व्याप्ती व मर्यादा निश्चित करावी लागते.

1) क्षेत्र व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन विषय हे नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यांतील ग्रामीण व शहरी भागांतील मातंग समाजाचा सामाजिक आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थितीत ह्याचा शोध घेणार आहे.

2) आशय व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन विषयांमध्ये नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यातील मातंग समाजाचा आढावा शोध एवढया पुरताच व्यापक आहे.

3) घटक व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजातील कुटुंबांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास करुन त्यांची सद्यस्थिती काय हे मांडले आहे.

4) काल व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन हे डिसेंबर 2022 ते डिसेंबर 2025 या तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

संशोधन मर्यादा :-

कुठलेही संशोधन करतांना संशोधकाला या विषयांची व्याप्ती व मर्यादा निश्चित करावी लागते.

1) क्षेत्र मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे नांदेड जिल्हयातील सोळा तालुक्यातील मातंग समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती याचा शोध घेणार आहोत.

2) आशय मर्यादा :-

विविध ग्रंथातून व साहित्यातून या समाज गटाच्या इतिहासाचा झालेल्या मांडणीचा अभ्यास या संशोधनातून करण्यात येणार असून नांदेड जिल्हयातील सोळा तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास केला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या हयातीत असलेला मातंग समाजाची सामाजिक आर्थिक व राजकीय स्थिती काय होती व तसेच 1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले व त्यांनी जी दलितांची चळवळ उभी केली त्यात मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थित्यंतर कसे होत गेले व त्याचा परिणाम मातंग समाजावर काय झाला. नांदेड जिल्हयातील मातंग समाजाची मुलाखत घेऊन मांडण्याचा प्रयत्न केला जाईल.

3) घटक मर्यादा :-

प्रस्तुत सदर संशोधन मध्ये नांदेड जिल्हयातील सोळा तालुक्यातील मातंग समाजाच्या कुटुंबांना प्रत्यक्ष भेटून समाजाच्या सामजिक, आर्थिक व राजकीय ऐतिहासिक स्थितीची सद्यस्थिती काय आहे.

4) काल व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन हे डिसेंबर 2022 ते डिसेंबर 2025 या तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

परिमर्यादा :-

संशोधनाच्या परिमर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

1) प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा समाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती ह्यानुसार समाजातील वरील घटकांचा शोध घेण्यात येईल.
2) प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्हयातील सोळा तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील मातंग समाजाच्या समस्यांचे निराकरण करुन त्या समाजातील समस्यांचा समावेश केला जाईल.

संशोधनाची कार्यपद्धती :-

प्रस्तुत संशोधन विषय विविध संशोधन पद्धतीच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येणार आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय तसेच त्यांच्या ऐतिहासिक आणि उपयोजित संशोधन पद्धतीच्या माध्यमातून तसेच नांदेड जिल्हयातील मातंग समाजातील कुटुंबातील व्यक्तीसोबत प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती मिळवली जाईल तसेच विविध साहित्य ग्रंथ याचा वापर करुन वरील घटकाचा अभ्यास केला जाईल.

नमुना व नमुना निवड पद्धत :-

नांदेड जिल्हयातील मातंग समाजाच्या कुटुंबातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धती अंतर्गत प्रश्नावली, मुलाखत व निरिक्षण या माध्यमातून माहिती मिळविण्यासाठी या नमुना निवड पद्धतीमध्ये गुणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची कार्यवाही :-

1) प्रथम संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात येईल व मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली समस्या निश्चित केली जाईल.
2) समस्या व उदिष्टयानुसार संशोधन कार्य पद्धती ठरवली जाईल.
3) मार्गदर्शक यांच्या मार्गदर्शनानुसार प्रकरण लिहिले जाईल व पुन्हा चुकीची तपासणी केली जाईल.
4) अर्थनिर्वाचण व विश्लेषण केल्यानंतर मार्गदर्शक मार्फत तपासूण घेतले जाईल व दुरुस्तीचे निराकरण केले जाईल.
5) माहिती संकलन साधनाचे प्रमाणिकरण टप्याटप्याने करण्यात येईल.
6) प्रबंधाचे बांधणी करुन त्यावर मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेऊन पाच प्रतित विद्यापीठात सादर केले जाईल.
7) नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती : ह्या विषयांचे विश्लेषण करण्यात येईल.
8) संकलन माहितीचे अर्थनिर्वाचन व विश्लेषण करण्यात येईल.
9) नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्तिथीनुसार मातंग कुटुंबातील व्यक्तीशी मुलाखतीच्या माध्यमातून प्रश्नावली तयार केली जाईल

प्रयोजन :-

मातंग समाजाच्या इतिहास लिहीणे व इतिहास लेखनात जाती जमातींचा त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पार्श्वभूमीवर इतिहास लिहिला जाऊ शकतो. हे प्रयोजन समोर ठेऊन मातंग समाजाचे ऐतिहासिक पैलू संकलित करुन दंतकथा, मुलाखती, प्रश्नावली, संदर्भ ग्रंथ , साहित्य, याचा आधार घेऊन मातंग जातीचा इतिहास व त्याचे

सामाजिक, आर्थिक व राजकीय तसेच सांस्कृतीक जीवन अभिलेखांकित करणे हेच प्रयोजन आहे व हे प्रयोजन साध्य होईल. असे मला वाटते.

प्रबंधाची प्रकरण योजना :-

1) प्रस्तावना
2) संबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा
3) संशोधनाची कार्यपद्धती
4) माहितीचे विश्लेषण व आढावा.
5) निष्कर्ष व समारोप.

प्रस्तुत संशोधन विषयी नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती हा संशोधन विषय पुढील प्रकरणाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येईल.

प्रकरण 1 ले:-

प्रस्तावना :-

भारतीय जातीव्यवस्थेत मातंग समाजाची उत्पत्ती कशी झाली ? आज हजारों वर्षापासून हा समाज एकेकाळी स्वतःला राज्यकर्ती जमात म्हणून ओळख असलेल्या या समाजाला आज अस्पृश्य समजला जातो. हा समाज पारंपारिक रुढीनुसार हलगी वाजवणे, मढयाच्या गोवऱ्या वाहणे, बिगार करणे, बाजा वाजवणे, टोपली बनवणे, दोरी वळणे, झाडू बनवणे अश्या प्रकारचे काम करुन लोकांच्या गरजा भागवीत आहेत. मातंग समाज हा महाराष्ट्रातील प्रमुख जातीपैकी एक आहे. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या जनगणनेनुसार दुसऱ्या क्रमांकावर लोकसंख्येत आहे. तसेच ऐतिहासिकदृष्टया त्यांना अस्पृश्य जात म्हणून मातंग समाजाला ओळखले जाते. तसेच महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय अस्पृश्य जातीतील समुदायाच्या तुलनेत मातंग समाज हे निरक्षर आणि व विखुरलेला समुदाय आहे. तसेच नांदेड जिल्हयातील मातंग समाजाचा वास्तविक स्थितीचे विश्लेषण केले आहे. जिथे दलित राजकारणाने अनुसूचित जातीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. असे असूनही सर्व अनुसुचित जातीमध्ये मातंग समाजाच्या जीवनात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मापदंडामध्ये समान प्रमाणात विकसित झालेला नाही. इतर मागास जातीपेक्षाही मातंग समाज सर्व गोष्टीत खालच्या पातळीवर राहिला आहे. गावामधील कारभार आणि बलुतेदारी व्यवस्थेत त्यांना

महत्त्वाचे स्थान होते. तरी महाराष्ट्रात शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टया सर्वाधिक दडपलेला आणि दुर्लक्षित झालेला समाज आहे.

अस्पृश्यांच्या श्रेणीत मोडणाऱ्या व आजही अत्यंत गरिबीत जीवन जगणाऱ्या मातंग समाजाच्या व आर्थिक स्थितीचा अभ्यास करुन त्याची ऐतिहासिक अभिलेखांकन करावे या हेतून मी (नांदेड जिल्हयातील मातंग समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास व सद्यस्थिती) हा विषय निवडला आहे. त्यासाठी नांदेड जिल्हयातील मातंग समाजाची समाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती कशाप्रकारे परिवर्तनशील राहिली याचा ऐतिहासिक आढावा या प्रबंधात घेतला आहे. या माध्यमातून मातंग समाजाच्या इतिहासाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण 2 रे :-

मातंग समाजातील लोकांची सामाजिक स्थिती :-

मांग ही प्रमुख जातींपैकी एक आहे, जी महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येच्या जनगणनेनुसार दुसऱ्या क्रमांकावर आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, त्यांना अस्पृश्य जात म्हणून ओळखले जाते आणि त्यांना 'मातंग' म्हणूनही ओळखले जाते. अस्पृश्यांमध्ये मातंग समाज जातीयव्यवस्थेच्या उतरंडीत सर्वात खालचे आहेत. जातीव्यवस्थेतील मांगांचे स्थान आणि त्यांच्या जातीच्या स्थानाच्या आधारावर त्यांच्यात कसा भेदभाव केला जातो याचे विश्लेषण केले आहे. महार आणि चांभार यांसारख्या महाराष्ट्रातील इतर अस्पृश्य जाती समुदायांच्या तुलनेत बहुसंख्य मांग हे निरक्षर आणि कमीत कमी जमवलेले समुदाय आहेत. तसेच भारताच्या स्वातंत्र्यानंतर मांग समाजातील बदल आणि परिवर्तनाची प्रक्रिया तपासण्यात आली आहे. स्वातंत्र्यानंतर, काही विशिष्ट घटनात्मक तरतुदींद्वारे त्यांना उपलब्ध करून दिलेल्या नवीन संधींमुळे अनुसूचित जाती अधिक गतिशील आणि परिवर्तनशील बनल्या आहेत. तथापि, अनुसूचित जातींमधील अनेक जाती स्वातंत्र्यानंतर झालेल्या मोठ्या बदल आणि परिवर्तनांच्या प्रक्रियेत एक प्रकारची पिछाडी दर्शवतात. या महाराष्ट्रातील मांगांच्या वास्तविक स्थितीचे विश्लेषण केले आहे, जिथे दलित राजकारणाने अनुसूचित जातींच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असे असूनही सर्व अनुसूचित जाती त्यांच्या जाती जीवनाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मापदंडांमध्ये समान प्रमाणात विकसित झाला नाही.

त्याचप्रमाणे एक अस्पृश्य म्हणून मातंग समाजातील व्यक्तींना समाजाकडून मिळणारी वागणूक व सामाजिक आणि धार्मिक बंधनातील त्यांचे जीवन स्पष्ट केले आहे. अस्पृश्य म्हणून मातंग समाजाने मंदिरात प्रवेश करण्याचे जेव्हा धाडस दाखविले तेव्हा त्याला ठार मारण्याच्या धमक्या सवर्ण समाजाकडून देण्यात आल्या या घटनांचा मागोवा या प्रकरणात घेतला आहे. मातंग समाजाची मानसिकता अजून हिंदू धर्मातील

परंपरा जपणारी दिसून आली. त्याचप्रमाणे नांदेड जिल्हयातील मातंग समाज हिंदू धर्म व परंपरा जपणारा असूनही अद्यापही मागासलेलाच राहिला आहे. या सर्व घटनांचा परामर्श या प्रकरणात घेतला जाणार आहे.

प्रकरण 3 रे :-

मातंग समाजाची आर्थिक स्थिती :-

स्वातंत्र्यानंतर मातंग समाजाच्या जीवनात आमुलाग्र बदल घडून आला असला तरी ग्रामीण भागातील मातंग समाजाच्या बाबतीत आर्थिक मागासलेपण दूर झाले नाही. महाराष्ट्रातील मातंग समाज हा आजही अनुसुचित जातीमध्ये एक प्रमुख जात असुन एकेकाळी ती राजकीय जमात म्हणून ओळखली जात होती. ज्या वेळेस गावगाड्याची रचना पुर्ण झाली होती त्यावेळेस कामाची वाटणी पूर्ण झाली होती. मातंग समाज हा उशीरा गावगाड्यात सामील झाला. त्याला कोणताही प्रमुख व्यवसाय शिल्लक राहिला नाही. गावकुसा बाहेर महारांच्या वस्ती जवळ आसऱ्याने राहूण मिळेल ते काम करु लागला. व पुढील प्रमाणे मातंग समाजातील पारंपारिक रुढी परंपरेमधील हलगी वाजवणे, बिगार करणे, टोपली बनवणे, झाडू बनवणे, दोरी वळणे इत्यादी अशा हलक्या दर्जाची कामे करत होता. पुढे आधुनिक युगात नवीन तंत्रज्ञानामुळे विकसित झालेली वाजतंत्री यामुळे समाजातील पारपंररिक व्यवसायामुळे रोजगाराला मर्यादा आल्या. त्यातच मातंग समाज होरपळून निघाला जो मातंग समाज शिक्षणाच्या प्रवाहात आला त्याने आपले पारंपारिक उद्योग सोडून नौकरीत स्थिर झाले त्यामुळे त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे का? त्यामानाने मातंग समाजाचे ग्रामीण भागातील जीवनमान दारिद्रयरेषेखाली आढळून आले या सर्व घटकांची पाहणी मुलाखत, प्रश्नावलीद्वारे, निरिक्षण व सर्वेक्षण करुन मातंग समाजाच्या आर्थिक स्थितीचे चित्रण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. या समाजातील काही पारंपारिक व्यवसाय काही शेती व मजूरी करणारे, नौकरी करणारे यांचे वर्गीकरण करुन मातंग समाजाचा आर्थिक स्थितीचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण 4 थे :-

मातंग समाजाचा राजकीय ऐतिहासिक वारसा व सद्यस्थिती :

भारत देशाच्या भुतकाळात जसे जसे खोल जावे. तसे तसे मातंग समाजावर पडलेली धुळ कमी होत जाऊन शेवटी एक स्वच्छ सुंदर वैभवशाली मातंग समाज दृष्टिप्रथास आला मातंग समाजाला भुतकाळात शोधत गेल्यास मातंग हे देशाच्या मुळ भुमिपुत्रा पैकी एक असुन तो अतिप्राचीन काळापासुन राज्यकर्ता असल्याची सिद्ध होते. बौद्ध कालीन सम्राट प्रसन्नजित राजा हा ही मातंग होता व पाणिनींच्या संस्कृत साहित्यामध्ये व त्यावेळच्या पाली भाषेतील ललीत विस्तार या ग्रंथामध्ये मातंग कुळांच्या आठ राज्याच्या संदर्भ आला आहे. एकेकाळी राजकर्ती असलेली जमात बाहेरुन आलेल्या आर्यांच्या आक्रमणामुळे पराभव झाला व त्यांनी मातंग राज्यकर्तांना गुलाम

केले. पुढे या समाजाची दयनीय अवस्था झाली व भयभीत पणे जिवन जगु लागले. पुढे चालून आधुनिक युगात मातंग समाजाला : क्रांतीकारी लहूजी साळवे, सत्यशोधक मुक्ता साळवे,फकिरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, लोकशाहिर आण्णा भाऊ साठे या समाजसुधारक व महापुरुषांमुळे मातंग समाजाला एक वैचारिक वारसा लाभ्ला. पुढे चालुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनाची सामाजीक चळवळ सुरु केले होती त्यात मातंग समाज हा अग्रस्थानी होता. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर मातंग समाज हा चळवळीपासुन दुर गेल्याचे दिसुन येते. हिंदू धर्मात मातंग समाजाला काहीच स्थान नसल्यामुळे मातंग समाजाची अवस्था झाली. इतर मागास जाती संघटीत पणे आपल्या पदरात सत्तेची राजकीय पदे पाडुन घेतली मात्र संघटने अभावी मातंग समाज स्वता:ची राजकीय शक्ती उभी करु शकला नाही हीच शोकांतीका आहे. या प्रकरणामध्ये मातंग समाजाचा राजकीय चळवळीचा परामर्श घेतला जाणार आहे.

प्रकरण 5 वे :-

मातंग समाजाचे सांस्कृतिक जीवन :

प्रस्तुत प्रकरणातून संस्कृती म्हणजे काय ? मातंग समाजाची विशेष सांस्कृतिक याचा परामर्श घेऊन प्रस्तुत प्रकरणातून महाराष्ट्रातील मातंग समाजाची लग्न सोहळा इतर सण उत्सव त्या त्या प्रसंगातील गीते रुढी परंपरा संगीत, म्हणी, वाक्यप्रचार आजही रुढ असल्याचे दिसून येते त्याशिवाय मातंग समाजातील साहित्य कला व त्यांचे सांस्कृतिक योगदान या साधनाद्वारे महाराष्ट्रातील तसेच नांदेड जिल्हयातील मातंग समाजाची सांस्कृतिक जीवनाचे अभिलेखांकन केले जाणार आहे. भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून मातंग समाजाला विशेष महत्त्व आहे एक स्वाभिमानी पराक्रमी आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे एक प्रामाणिक इमानदार जात समुह म्हणून हिंदू धर्माच्या संस्कृतीत मातंग समाजाचा गौरव केला जातो. तसेच गावात कुठल्याही शुभ कार्यात मातंग समाजातील पती पत्नी अग्रभागी असतात. लोक परंपरा आणि धर्म संस्कृतीमध्ये मांगांना पवित्र आणि शुभ मानल जात असे तसेच प्राचीन काळातील शासनकर्ती जमात म्हणून होती. पुढील कालांतराने त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात त्या समाजाची खूप प्रमाणात दयनीय अवस्था कशी झाली याचा परामर्श घेतला जाणार आहे.

प्रकरण 6 वे :-

समारोप व निष्कर्ष :-

प्रस्तुत वरील पाच प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील तसेच नांदेड जिल्हयातील मातंग समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्टया जडण-घडण कशी होत गेली याची विविध टप्प्यांची मांडणी केलेली आहे. त्याचा सारांश या प्रकरणात देण्यात आला आहे. तसेच संशोधकांची गृहीतकांची मुलाखत, प्रश्नावली, सर्वेक्षण व निरिक्षणाच्या माध्यमातून पडताळणी करुन माझे निष्कर्ष मांडणार आहे.

वेळापत्रक

अ. क्र.	संशोधन कालावधी	नियोजित कार्य
01)	डिसेंबर 2022 ते फेब्रुवारी 2023	पूर्व साहित्याचे वाचन
02)	मार्च 2023 ते मे 2023	पूर्व साहित्याचे वाचन
03)	जून 2023 ते ऑगस्ट 2023	पूर्व साहित्याचे वाचन, कोर्सवर्क परीक्षा
04)	सप्टेंबर 2023 ते डिसेंबर 2023	पूर्व साहित्याचे वाचन, संशोधन पेपर वाचन चर्चा सत्र सहभाग व तयारी
05)	जानेवारी 2023 ते मार्च 2024	संशोधन पेपर वाचन, चर्चा सत्र सहभाग व तयारी, प्रश्नावली निर्मिती, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन
06)	एप्रिल 2024 ते जून 2024	संशोधन पेपर वाचन, चर्चा सत्र सहभाग व तयारी, प्रश्नावली निर्मिती, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन
07)	जुलै 2024 ते सप्टेंबर 2024	चर्चा सत्र सहभाग व तयारी क्षेत्र अभ्यास माहिती संकलन
08)	ऑक्टोंबर 2024 ते डिसेंबर 2024	चर्चा सत्र शोध घेणे, तयारी करणे, माहिती संकलन
09)	जानेवारी 2025 ते मार्च 2025	चर्चा सत्र शोध घेणे, तयारी करणे, माहिती संकलन
10)	एप्रिल 2025 ते जून 2025	संशोधन पेपर प्रकाशित करणे व संकलित माहितीचे विश्लेषण
11)	जुलै 2025 ते सप्टेंबर 2025	संशोधन प्रबंध लेखन, सारांश लेखन
12)	आक्टोंबर 2025 ते डिसेंबर 2025	प्रबंध सादरीकरण व पूर्व मुलाखतीची तयारी

संदर्भ सूची :-

1) Dr. C.K. Harnavale (2016), Socio - Economics Problems of Matang Samaj (Adi publication, Jaipur)
2) डॉ. मारोती कसाब (2020), मातंग : इतिहास आणि संस्कृती, (बीज प्रकाशन, नगर)
3) प्रा. डॉ. प्रविण जाधव :- मातंग समाज एक विश्लेषण
4) डॉ. सोमनाथ डी. कदम :- मातंग समाजाचा इतिहास
5) डॉ. माधव बसवंते :- (2010) मातंग समाज : इतिहास आणि वास्तव
6) प्रा. डॉ. शरद गायकवाड :- मातंग समाज : साहित्य आणि संस्कृती
7) इंटरनेट

संशोधक

बसवंते अविनाश शेषराव

(एम.ए. इतिहास, नेट)

मो. न. 9823733464

ई-मेल - avinashbaswante95@gmail.com

जात वर्ग - SC

मार्गदर्शक

प्रा. डॉ. साखरे व्ही. के.

संशोधन मार्गदर्शक, प्राध्यापक तथा UG व PG

इतिहास विभाग

मो. न. 9890749443

ई-मेल - vijayasakhare1969@gmail.com